# ठाणेनगर वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/७६/२०२५ दि. १४/०४/२०२५

## "वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

ज्याअर्थी, ठाणे वाहतुक विभागाचे कार्यक्षेत्रातील ठाणेनगर वाहतूक उपविभागाचे हद्दीत १४/०४/२०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर १३४ व्या जंयती निमित्त मानवंदना कार्यक्रम होणार असुन सदर कार्यक्रमानिमीत्ताने परंपरे नूसार **दि. १५/०४/२०२५ रोजी व दिनांक १६/०४/२०२५ रोजी सकाळी १०:०० ते रात्रौ २२:०० वाजेपावेतो लहान मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रम, मनोरंजन, गीतगायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.** तरी सदर कार्यक्रमानिमीत्त मोठया प्रमाणात अनुयायांची तसेच प्रेक्षकांची गर्दी होणार असुन सदर परिसरात वाहतुक कोंडी होवू नये, वाहतुक सुरळीत व सुनिश्चित होण्याकरीता, आम जनतेच्या सोयीसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे:–

**प्रवेश बंद** – १) खोपट कडुन आंबेडकर रोड मार्गे जाणारी सर्व प्रकारच्या वाहनांना **खोपट** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** – सदरची वाहने ही खोपट कडुन डावे वळण घेवून कोलबाड रोड मार्गे मिनाताई ठाकरे चौक मार्गे उजवीकडे वळण घेवून होलीक्रॉस स्कुल मार्गे जीपाओ कडे येवून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद** – २) आंबेडकर रोड कडून खोपट कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **आंबेडकर रोड कट** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** – सदरची वाहने ही आंबेडकर रोड कट येथून डावे वळण न घेता सरळ जावून उथळसर रोडने सरळ जावून मिनाताई ठाकरे चौक येथे डावे वळण घेवून खोपटला येवून इच्छित स्थळी जातील.

**नो पार्कीग** – खोपट कडुन आंबेडकर रोड या परिसरात रस्त्याच्या दोन्ही बाजुस वाहने पार्किंग करण्यास मनाई करण्यात येत आहे.

सदरची अधिसुचना दिनांक १५/०४/२०२३ रोजी व दिनांक १६/०४/२०२५ रोजी सकाळी १०:०० वा. ते रात्रौ २२:०० वा. पावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनास लागु राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

CamScanner

मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१/वि.शा. ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे,
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे, भिवंडी
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

प्रत:– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पो.निरी. नौपाडा, ठाणेनगर, कळवा, राबोडी वाहतूक उपविभाग ठाणे.

CamScanner